# ९. नकाशाप्रमाण

**प्रश्न १. (अ) खालील बाबींच्या नकाशांचे बृहप्रमाण नकाशा व लघुप्रमाण नकाशा असे वर्गीकरण करा.**

**(१) इमारत (२) शाळा (३) भारत देश (४) चर्च (५) मॉल (६) जगाचा नकाशा (७) बगिचा (८) दवाखाना (९) महाराष्ट्र राज्य (१०) रात्रीचे उत्तर आकाश**

**उत्तर:** दिलेल्या बाबींच्या नकाशांचे बृहप्रमाण नकाशा व लघुप्रमाण नकाशा असे वर्गीकरण पुढीलप्रमाणे आहे:
**(अ) बृहद्‌प्रमाण नकाशा:** (१) इमारत (२) शाळा (३) चर्च (४) मॉल (५) बगिचा (६) दवाखाना.
**(ब) लघुप्रमाण नकाशा:** (१) भारत देश (२) जगाचा नकाशा (३) महाराष्ट्र राज्य (४) रात्रीचे उत्तर आकाश.

**(आ) १ सेमी = १०० मी व १ सेमी = १०० किमी अशा प्रमाणाचे दोन नकाशे आहेत. यांपैकी बृहद्‌प्रमाणाचा नकाशा व लघुप्रमाणाचा नकाशा कोणता ते सकारण लिहा. या नकाशांचे प्रकार ओळखा.**

**उत्तर: (अ)** १ सेमी = १०० मी व १ सेमी = १०० किमी अशा प्रकारचे दोन नकाशे आहेत. यांपैकी १ सेमी = १०० मी हा बृहद्‌प्रमाणाचा नकाशा आहे.

**(ब) कारणे:**
(१) १ मीटर म्हणजेच १०० सेमी होय आणि १०० मीटर म्हणजे १०,००० सेमी होय.
(२) म्हणजेच, दिलेल्या नकाशातील शब्दप्रमाण १ सेमी = १०० मी आहे व संख्याप्रमाण १: १०००० आहे.
(३) १: १०००० किंवा त्यापेक्षा लहान प्रमाण असलेले सर्व नकाशे बृहप्रमाण नकाशे म्हणून ओळखले जातात. म्हणून १ सेमी = १०० मी हा बृहद्‌प्रमाण नकाशा आहे.

**(क) प्रकार:**
(१) गाव, शेत, बगिचा इत्यादींचे नकाशे बृहद्‌प्रमाण प्रकारचे नकाशे आहेत. (२) भारत देश, जग, रात्रीचे उत्तर आकाश इत्यादींचे नकाशे लघुप्रमाण प्रकारचे नकाशे आहेत.

**प्रश्न २. नकाशसंग्रहातील भारताच्या नकाशातून खालील. शहरांमधील अंतर सरळरेषेत नकाशा प्रमाणाच्या साहाय्याने मोजा व ती खालील तक्त्यात नोंदवा.**
**उत्तर:**


| शहरे | नकाशातील अंतर | प्रत्यक्ष अंतर |
|---|---|---|
| **१. मुंबई ते बंगळुरू** | ०.९८ सेमी | ९८० किमी |
| **२. विजयपुरा ते जयपूर** | २ सेमी | २००० किमी |
| **३. हैदराबाद ते सुरत** | ०.९ सेमी | ९०० किमी |

| | | |
|---|---|---|
| **४. उज्जैन ते शिमला** | १.१४ सेमी | ११४० किमी |
| **५. पटना ते रायपूर** | ०.७५ सेमी | ७५० किमी |
| **६. दिल्ली ते कोलकाता** | १ सेमी | १००० किमी |

**प्रश्न ३.**

**(अ) जमिनीवरील अ व ब या दोन ठिकाणांमधील अंतर ५०० मी आहे. हे अंतर कागदावर २ सेमी रेषेने दाखवा. कोणतेही एक नकाशाप्रमाण काढा व हे नकाशाप्रमाण कोणते, ते शेजारी लिहा.**

**उत्तर:**




**(आ) १ सेमी= ५३ किमी या शब्दप्रमाणाचे अंकप्रमाणात रूपांतर करा.**

**उत्तर:** (१) १ किमी म्हणजे १००००० सेमी होय आणि ५३ किमी म्हणजे ५३००००० सेमी होय.
(२) म्हणून १ सेमी = ५३ किमी या शब्दप्रमाणाचे १: ५३००००० याप्रमाणे अंकप्रमाणात रूपांतर होईल.

**(इ) १:१००००० या अंकप्रमाणाचे मेट्रिक पद्धतीच्या शब्दप्रमाणात रूपांतर करा.**

**उत्तर:** १००००० सेमी म्हणजे १ किमी होय.
(२) १ : १००००० या अंकप्रमाणाचे १ सेमी = १ किमी हे मेट्रिक पद्धतीच्या शब्दप्रमाणात रूपांतर होय.

**४. यांना मदत करा. त्यासाठी नकाशासंग्रहातील महाराष्ट्र राज्याचा रस्ते व लोहमार्ग नकाशा वापरा. नकाशातील प्रमाणाचा उपयोग करा.**

**(अ) अजयला कौटुंबिक सहलीचे आयोजन करायचे आहे. बीड- औरंगाबाद- धुळे- नाशिक - मुंबई- पुणे सोलापूर - बीड या मार्गांतील पर्यटन स्थळांना भेटी दयायच्या आहेत. गाडीला दर किमीला १२ रु. प्रवास भाडे आहे. तर एकूण प्रवासासाठी त्यांना अंदाजे किती खर्च येईल?**
( ह्या प्रश्नांची उत्तरे  विद्यार्थांनी स्वयं अध्ययन करून लिहावीत )

**(आ) सलोनीला तिच्या वर्गशिक्षिकेने सहलीचे नियोजन करण्यास सुचवले आहे. सहलीसाठी तिने खालील ठिकाणे निवडली आहेत. बुलढाणा-औरंगाबाद-परभणी-हिंगोली-अकोला - बुलढाणा तर**

**त्यांचा एकूण प्रवास किती किमी होईल?**
(ह्या प्रश्नांची उत्तरे  विद्यार्थांनी स्वयं अध्ययन करून लिहावीत)

**(इ) विश्वासरावांना अलिबागहून (जि. रायगड) नळदुर्ग (जि. उस्मानाबाद) येथे त्यांच्या मालवाहू गाडीमधून मालवाहतूक करायची आहे. त्यांना जाण्या-येण्यासह अंदाजे किती किमी अंतराचा प्रवास करावा लागेल?**

(ह्या प्रश्नांची उत्तरे  विद्यार्थांनी स्वयं अध्ययन करून लिहावीत)